# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

प्रकाशगड, २रा मजला, प्लॉट नं. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.
दूरध्वनी क्र. : ०२२-२६४७४२११ विस्तारित : ३६४२, फक्स : ०२२-२६५८१५१६.
ई-मेल : promahagenco@gmail.com / promahagenco1@gmail.com


क्र. : सा.नि.सु./जनसंपर्क/वृत्तपत्रीय टिप्पणी/ दिनांक : २९/०५/२०२०.

## "महानिर्मितीच्या वीज उत्पादनात लक्षणीय वाढ"

-------------------

**मुंबई (दि. २९ मे २०२०) :** गेल्या सुमारे दोन महिन्यांपासून लॉकडाऊनच्या कारणाने राज्यातील विशेषतः औद्योगिक तसेच वाणिज्यिय वीज ग्राहकांकडून विजेच्या मागणीत मोठी घट झाली होती. तथापि, आता अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी व जनजीवन हळूहळू पूर्वपदावर आणण्याच्या राज्य शासनाच्या प्रयत्नांनुसार राज्यभरातील विविध उद्योग तसेच वाणिज्यिय संस्थांनी आपापले नित्य उत्पादन-कार्य सुरू केल्याने आता राज्याच्या विजेच्या मागणीत वाढ होताना दिसत आहे.

दि 28 मे रोजी राज्याची शिखर मागणी मुंबईच्या मागणीसह 21288 मेगावॅट इतकी होती. तर आज दि 29 मे रोजी दुपारी 12.45 वाजता राज्याची विजेची एकूण मागणी 20356 मेगावॅट इतकी होती. ही मागणी पुरविण्यात महानिर्मितीचे 6637 मेगावॅट इतके लक्षणीय योगदान असून त्यात महानिर्मितीच्या औष्णिक संचातुन 6278 मेगावॅट विजेचा मुख्यत्वे समावेश आहे. या व्यतिरिक्त राज्याला सध्या केंद्रीय ग्रीड मधून सुमारे 6166 मेगावाट व खाजगी वीज उत्पादकांकडून एकूण सुमारे 5400 मेगावाट इतक्या प्रमाणात विजेचा पुरवठा होत आहे.

या वाढीव मागणीनुसार महानिर्मितीच्या विविध वीजकेंद्रातून कर्मचाऱ्यांच्या करोनासंबंधित आरोग्यविषयक सर्व प्रतिबंधक दक्षता घेऊन वीज उत्पादन साध्य केले जात आहे. विजेचे उत्पादन मागणीनुसार व्हावे यासाठी वरिष्ठ व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनाखाली महानिर्मितीचे अभियंते, तंत्रज्ञ अथक परिश्रम घेत आहेत.

महानिर्मितीचे एकुण 28 औष्णिक संच वीजनिर्मितीसाठी सुसज्ज असून सध्या मागणीनुसार त्यापैकी 19 संच सुरू आहेत. मेरिट ऑर्डर डिसपॅच प्रणालीनुसार सध्या कोराडी येथील प्रत्येकी 210 मेगावॅट चे 2 संच,भुसावळ येथील 500 मेगावॅट क्षमतेचा 1 व 210 मेगावाट क्षमतेचा 1 असे 2 संच, नाशिक येथील प्रत्येकी 210 मेगावॅट चे 3 संच, तसेच परळी येथील प्रत्येकी 250 मेगावॅट क्षमतेचे 2 संच असे एकूण 9 संच झिरो शेड्युलनुसार बंद ठेवण्यात आलेले आहेत. तथापि, हे सर्व संच सुस्थितीत असून आगामी काळात विजेची मागणी ज्या प्रमाणात वाढेल त्यानुसार टप्प्याटप्प्याने या संचातुन वीजनिर्मिती सुरू करता येईल.

या सर्व वीजकेंद्रात सध्या कोळशाचा पुरेसा साठा असून वीजकेंद्रात कोळसासाठ्याची योग्य निगा राखली जात असल्याने हा साठा पावसाळ्यात ओला कोळसा- कोळसा टंचाई अशा समस्यांवर मात करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो.

---

दिनांक : २९/०५/२०२०.

प्रति,
**मा. संपादक**
**दैनिक / वृत्तवाहिनी**

आदरणीय महोदय / महोदया,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तींत / वाहिनीवर प्रसिद्ध करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपले स्नेहांकित,

**(महेश आफळे)**
**जनसंपर्क अधिकारी**